विशेष **दिवाणी दावा क्र. ६४/२०२५**
**युनियन ऑफ इंडिया वि. गोविंद मुंद्रा वगैरे**
**CNR No. MHRG**020000902007

## <u>निशाणी क्र. १४४ वरील आदेश</u>

(पारित दिनांक १९/०७/२०२५)

अबेटमेंट रद्द करण्यासाठी सदरचा अर्ज आहे. वादीचे कथन असे की, प्रतिवादी क्र. ३ विश्वनाथ दाते हे दिनांक २४/०३/२०२० रोजी मयत झाले असुन त्यांचे वारस ९० दिवसांच्या आत अभिलेखावर घेता आले नाहीत त्यामुळे सदर प्रतिवादीविरुध्द दावा अबेट झाला आहे. ती अबेटमेंट रद्द करण्यात यावी अशी वादीची विनंती आहे.

०२. प्रतिवादी क्र. ३, ४अे ते ४डी, ५अे/३ व ५डी यांनी सदर अर्जास हरकत घेतली आहे की, वादी शासन आहे म्हणुन त्यांना प्रतिवादीच्या कुटूंबाची माहिति नव्हती हे मान्य करता येणार नाही. तसेच वादींनी त्यांना सदरची माहिति केव्हा प्राप्त झाली हे नमुद केले नाही, त्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा अशी या प्रतिवादींची विनंती आहे.

०३. अभिलेखाचे अवलोकन केले. मृत्युउता–यानुसार प्रतिवादी क्र. ३ विश्वनाथ दाते हे दिनांक २४/०३/२०२० रोजी मयत झाले आहेत. ९० दिवसांत वारस अभिलेखावर घेतले नाहीत त्याकरीता झालेला विलंब दंड भरण्याच्या अटीवर माफ करण्यात आला आहे. तसा आदेश नि.क्र. १४० वर करण्यात आला आहे. त्यामुळे हा अर्ज मंजुर करणे आवश्यक आहे. सबब आदेश.

## <u>आदेश</u>

अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

AMOL ASHOK SHINDE
Digitally signed by AMOL ASHOK SHINDE
Date: 2025.07.21 10:51:05 +0530

**अलिबाग** **(अमोल अ. शिंदे)**

दिनांक - १९.०७.२०२५ सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अलिबाग